# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 23/06/2020 (सोमवार)

(सकाळ)

### दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 07 कि. मी अंतरावर लौणखैरी खापरखेडा येथे दिनांक 22/06/2020 चे 07:00 वा. ते 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ सुनीता राम गीरी, वय 30 वर्ष, रा. लौणखैरी, खापरखेडा या आपले घरी हजर असतांना आरोपी नामे– मनोज गजानन पुरी, रा. लौणखैरी हा फिर्यादीचे घरासमोर येवुन फिर्यादीच्या मुलाला शिवीगाळ करीत होता. दरम्यान फिर्यादीने हटकले असता आरोपीने दारू पीउन शिवीगाळ केली. तसेच आरोपीने फिर्यादीला लोखंडी रॉडने डाव्या हाताचे पंजावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा गुरूप्रकाश मेश्राम हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. वेलतुर :– दि. 22/06/2020 चे 17:30 वा. चे सुमारास 32 वर्षीय फिर्यादी/पीडिता या त्यांच्या पती व ट्रॅक्टर ड्रायव्हर सह शेतात गेल्या होत्या. दरम्यान आरोपी नामे– मुरलीधर राजेराम काहालकर, वय 45 वर्ष, रा. बोरी, सदाचार, ता. कुही याने 'तुम्ही माझ्या शेतातुन ट्रॅक्टर का नेले?' असे म्हटले. यावरून पीडितेने आरोपीस म्हटले की, 'तुझ्या कोणत्या शेतातल्या जागेवरून ट्रॅक्टर गेले.' याकारणावरून आरोपीने पीडितेस अश्लील शब्दात बोलून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेस व तिच्या पतीला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(ब), 294, 323, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय पायक 8830923310 हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील जयभोले नगर वार्ड क्र. 1, खापरखेडा येथे दिनांक 21/06/2020 चे 20:30 वा. ते 20:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश पांडुरंग धुर्वे, वय 47 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, जयभोले नगर, खापरखेडा यांचे वडील नामे– पांडुरंगजी धुर्वे, वय 70 वर्ष, रा. जयभोले नगर वार्ड क्र. 1 हे जेवन झाल्यानंतर रोड वर फिरत असता दहेगाव कडुन कामठी कडे जानाऱ्या एका पांढऱ्या रंगाची चार चाकी अज्ञात वाहन कारचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पांडुरंगजी धुर्वे यांना धडक दिली. त्यांना उपचाराकामी मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोशीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. मेश्राम 9423115260 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर